*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XIV / Issue – I* *ISSN 2277-8063*

# आर्थिक साक्षरता आणि महिला सक्षमीकरण

**प्रा.शाहुराज व्यंकटराव गायकवाड** अर्थशास्त्र विभाग प्रमुख श्रीमत सी.बी.शाह महिला महाविद्यालय, सांगली

मो.न.९७६३०३६६४१

---

**प्रस्तावना**:

अर्थशास्त्रज्ञ श्री.अमर्त्य सेन यांनी असे म्हटले आहे की, "स्त्रियांना नेहमीच ज्याचा मोबदला मिळत नाही असे श्रम करावे लागतात.श्रमाच्या या विभागणीमुळे स्त्रिया संघटीत होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे त्यांचा साहजिकच आर्थिक विकास झालेला नाही.रोजगाराच्या संघटीत आणि असंघटीत क्षेत्रात महिलांना किती संधी दिली गेली आहे यावरून रोजगाराच्या क्षेत्रातील महिलांची प्रगती लक्षात येते." वरील त्यांचे विवेचन येथे महत्वाचे आहे,परंतु वास्तवात असे आढळून येईल की,स्त्री शिकली,कमावती झाली म्हणजे तिला आर्थिक स्वातंत्र्य मिळतेच असे नाही.स्त्रीने नोकरी करून पैसे कमावले तरी बरेचदा तो सर्व पैसा पतीच्या ताब्यात दिला जातो व त्यातून पती घर खर्च व इतर खर्च करतो. कांही उच्चभ्रू कुटुंबातून या परिस्थितीत परिवर्तन होत असले तरी अजूनही महत्वाची आर्थिक निर्णय महिलेचा पतीच घेतो.

नॅशनल सेंटर फॉर फायनान्शियल एज्युकेशन (NCFE) नुसार, भारतातील फक्त २१% महिला आर्थिकदृष्ट्या साक्षर आहेत, तर पुरुषांमध्ये हे प्रमाण २९% आहे. ही तफावत भारतातील महिलांसाठी आर्थिक शिक्षण सुधारण्याची तातडीची गरज अधोरेखित करते. दैनंदिन खर्चाचे व्यवस्थापन करण्यापासून ते निवृत्तीचे नियोजन करण्यापर्यंतआर्थिक साक्षरता हे एक महत्त्वाची कौशल्य आहे,जे महिलांना त्यांच्या आर्थिक बाबींबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम करू शकते. महिलांसाठी आर्थिक साक्षरतेचे महत्त्व आणि ते त्यांना कसे सक्षम करू शकतात याचा अभ्यास या शोध निबंधातून करणार आहोत.

**संशोधनाची गरज**:

पुरुष आणि महिलांच्या आर्थिक साक्षरतेच्या फरकावर प्रकाश टाकण्यासाठी विविध संशोधनात्मक कार्य करण्यात आले असले तरीही पुरुष आणि महिलांच्या आर्थिक साक्षरतेमध्ये खूप तफावत आजही आहे.पुरुष आणि महिलांच्या आर्थिक साक्षरतेमध्ये कोणत्या कारणांनी फरक पडेल याची कारण मिमांसा आतापर्यंत करण्यात आलेली नाही. त्यामुळे महिला आर्थिक निरक्षरतेचा प्रश्न गहन होत गेलेला आहे. सरकारच्या माध्यमातून या महत्वपूर्ण प्रश्नावर उपाय योजना करणे गरजेचे आहे. या संशोधनाच्या माध्यमातून महिलांची साक्षरता या प्रश्नावर प्रकाश टाकण्याचा छोटासा प्रयत्न केलेला आहे.

**शोध निबंधाची उदिष्टे** :

प्रस्तुत शोध निबंधाची उदिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

1. महिला आर्थिक साक्षरतेचा अभ्यास करणे.
2. महिला आर्थिक साक्षरतेवर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
3. महिला आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठी केलेल्या उपायांचा अभ्यास करणे.

**शोध निबंधाची गृहीतके :**

प्रस्तुत शोध निबंध पुढील गृहीतावर आधारित लिहिलेला आहे.

१. महिलांचा आर्थिक दर्जा दुय्यम आहे

२.महिलांची आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठी सरकारने अनेक उपाययोजना केलेल्या आहेत.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंध हा द्वितीय माहितीवर आधारित आहे.दुय्यम सामुग्रीमध्ये वेगवेगळे संदर्भ पुस्तकं संशोधन पेपर,मासिके व वेबसाईट इत्यादीचा आधार घेण्यात आलेला आहे.

आर्थिक साक्षरता म्हणजे काय ?

आर्थिक साक्षरता म्हणजे कर्ज घेणे, बजेट तयार करणे, गुंतवणूक करणे, कर आकारणी करणे आणि बचत करणे यासारख्या आर्थिक पैलूंचे ज्ञान होय.या ज्ञानाव्यतिरिक्त, आर्थिक साक्षरतेमध्ये सकारात्मक आर्थिक वर्तन स्वीकारणे, वित्तीय प्रणाली समजून घेणे आणि आर्थिक परिणामांवर आधारित माहितीपूर्ण समायोजन करणे समाविष्ट आहे.

महिलांसाठी आर्थिक साक्षरतेचे महत्त्व

समाजात महिला विविध भूमिका घेत असताना, आर्थिक शिक्षण पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाचे बनले आहे. आर्थिक साक्षरतेचे काही महत्त्वाचे फायदे पुढील प्रमाणे आहेत:

1. उत्पन्न आणि आर्थिक हितसंबंधांचे रक्षण करणे

आर्थिक साक्षरता महिलांना त्यांच्या कमाईचे आणि गुंतवणुकीचे संरक्षण करण्याचे ज्ञान देते, त्यांचे आर्थिक हितसंबंध चांगल्या प्रकारे संरक्षित आहेत याची खात्री करून देते.

2. आर्थिक स्वातंत्र्य

आर्थिक तत्त्वे समजून घेतल्याने, महिला देखील स्वतंत्रपणे आणि माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकतात, ज्यामुळे आर्थिक बाबींसाठी पुरुष, मित्र आणि नातेवाईकांवर अवलंबून राहणे कमी होईल.

3. कुटुंबाचे आर्थिक व्यवस्थापन

आर्थिक साक्षरतेमुळे आत्मविश्वास वाढतो, ज्यामुळे महिलांना त्यांच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक आर्थिक फायद्यासाठी योग्य निर्णय घेण्यास मदत होते.

4. करिअरची प्रगती

आर्थिक ज्ञानाच्या मदतीने, महिला उद्योजकीय उपक्रम आणि गुंतवणुकीच्या संधी शोधू शकतात, ज्यामुळे संपत्ती निर्मिती आणि आर्थिक सक्षमीकरणात महिलांचे योगदान मिळू शकते.

5. दीर्घकालीन वैयक्तिक सुरक्षा

आयुर्मान वाढत असताना आणि अधिकाधिक महिला स्वतंत्रपणे जगणे निवडत असताना, स्थिर आणि आरामदायी भविष्यासाठी आर्थिक साक्षरता आवश्यक बनते.

महिलांवरील आर्थिक साक्षरतेचा प्रभाव

भारतीय महिलांची आर्थिक साक्षरता विविध घटकामुळे प्रभावित होत असते.नवीन बाजारात प्रवेश केलेल्या महिलांवर आर्थिक साक्षरता महत्त्वपूर्ण परिणाम करू शकते अशी काही प्रमुख क्षेत्र पुढील प्रमाणे

माहितीपूर्ण कर्ज घेणे:

आर्थिक साक्षरतेमुळे कर्जाच्या अटी, व्याजदर आणि परतफेडीचे वेळापत्रक समजून घेता येते, शिवाय आर्थिक साक्षरता महिलांना पैसे उधार घेताना सुज्ञ निर्णय घेण्यास सक्षम बनवते.

2. कर्ज व्यवस्थापन:

कर्ज एकत्रीकरण आणि वेगवेगळया परतफेडीच्या धोरणांचे ज्ञान, कर्जांवर नियंत्रण ठेवण्यास आणि चांगली आर्थिक स्थिरता मिळविण्यासाठी काम करण्यास आर्थिक साक्षरताअनुमती देते.

3. क्रेडिट निर्माण करणे:

आर्थिक साक्षरता महिलांना चांगला क्रेडिट स्कोअर तयार करण्याची प्रेरणा देतो. चांगला क्रेडिट स्कोअर केवळ जबाबदार आर्थिक वर्तन दर्शवत नाही तर सुधारित आर्थिक संधींचे दरवाजे देखील उघडतो.

4. गुंतवणूक नियोजन:

विविध आणि लवचिक गुंतवणूक पोर्टफोलिओ तयार करण्यासाठी स्टॉक, बाँड्स, रिअल इस्टेट आणि म्युच्युअल फंड यासारख्या विविध गुंतवणूक पर्यायांना समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आर्थिक साक्षरतागुंतवणूक योजना महिलांना त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यास मदत करू शकते.

5. बजेटिंग कौशल्ये:

खर्चावर नियंत्रण मिळवण्यासाठी, जास्तीत जास्त बचत करण्यासाठी आणि महत्त्वाची आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रभावी बजेटिंग आवश्यक आहे.हे सर्व आर्थिक साक्षरतेमुळे साध्य होते.

6. आंतर-पिढ्यांचा प्रभाव:

आर्थिक बाबींची चांगली समज असल्याने पालकांना त्यांच्या मुलांनाही आवश्यक कौशल्ये आणि ज्ञान देणे शक्य होते. यामुळे वेगवेगळया पिढ्यांमध्ये आर्थिक साक्षरतेचे एक सतत चक्र स्थापित होण्यास मदत होते.

महिलांसमोरील आर्थिक आव्हाने

महिलांना तोंड द्यावे लागणारे काहीअनोखे आर्थिक आव्हाने पुढीलप्रमाणे आहेत

1. लिंग वेतन तफावत

जगभरात, महिलांना समान भूमिकेसाठी पुरुषांपेक्षा कमी पैसे मिळतात, ज्यामुळे त्यांची बचत, गुंतवणूक आणि संपत्ती जमा करण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. ही असमानता दीर्घकालीन आर्थिक असुरक्षितता आणि अवलंबित्व निर्माण करू शकते.

2. क्रेडिट स्कोअरमधील तफावत

महिलांचे क्रेडिट स्कोअर कमी असू शकतात, जसे की कमी उत्पन्न, कर्ज-उत्पन्न गुणोत्तर जास्त आणि कर्जाची कमी उपलब्धता. कमी क्रेडिट स्कोअरमुळे कर्ज मिळवण्याची किंवा अनुकूल व्याजदर मिळविण्याची त्यांची क्षमता मर्यादित होऊ शकते.

3. करिअरमधील ब्रेक

मुलांचे संगोपन करणे किंवा कुटुंबातील वृद्ध सदस्यांची काळजी घेणे यासारख्या जबाबदाऱ्यांसाठी महिला करिअर ब्रेक घेण्याची शक्यता जास्त असते. या ब्रेकमुळे उत्पन्न कमी होऊ शकते, निवृत्तीनंतरची बचत कमी होऊ शकते आणि त्यांच्या व्यावसायिक अनुभवात तफावत येऊ शकते.

4. नोकरी गमावणे

महिलांची नोकरी जाण्याची शक्यता जास्त असते, विशेषतः कमी स्थिर किंवा कमी पगार असलेल्या उद्योगांमध्ये ही अस्थिरता आर्थिक योजनांमध्ये व्यत्यय आणू शकते आणि आर्थिक अडचणींना कारणीभूत ठरू शकते.

५.अतिरिक्त जबाबदाऱ्या

महिलांना अनेकदा व्यावसायिक, घरगुती आणि काळजी घेण्याच्या जबाबदाऱ्यांसह अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. या जबाबदाऱ्यांच्या ओझ्यामुळे आर्थिक व्यवस्थापन आणि नियोजनावर लक्ष केंद्रित करणे शक्य होत नाही.

सरकारने महिला साक्षरतेसाठी केलेले प्रयत्न :

1. वित्तीय साक्षरता आणि पत समुपदेशन केंद्राची स्थापना

देशामध्ये सर्व स्तरावर आर्थिक साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी तसेच आर्थिक समावेशनाचा प्रसार करण्यासाठी भारत सरकारने देशात मोफत आर्थिक शिक्षण देण्यासाठी FLCC ( Financial Literacy and Credit Counseling Center)ची स्थापना केलेली आहे.

2. बेटी बचाव बेटी पढाओ योजना

बेटी बचाव बेटी पढाओ योजना ही भारत सरकारची एक योजना आहे,जी समाजातील महिलामध्ये सर्व प्रकारची जागरूकता निर्माण करण्याचे कार्य करते, तसेच महिलासाठी विविध कल्याणकारी सेवांची कार्यक्षमता वाढविण्याचे काम करते.

3. सुकन्या समृद्धी योजना

सुकन्या समृद्धी योजनेच्या माध्यमातून मुलगी व मुलगा यामध्ये भेदभाव दूर करण्यासाठी आणि मुलीला समान वागणूक देण्यासाठी तसेच तिच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी ही योजना सरकारने सुरु केली आहे.या योजनेच्या माद्यमातून महिला आर्थिक साक्षरता करण्याचे कार्य केले जाते.

4. प्रधान मंत्री जन धन योजना

हे एक सरकारचे महत्वाचे पाऊल आहे असे मानले जाते.देशातील स्त्रियांचे आर्थिक समावेशान वाढविण्यासाठी प्रत्येक कुटुंबापर्यंत आर्थिक बाबीची माहिती पोहचविणारी महत्वपूर्ण योजना आहे.या योजनेद्वारे समाजातील सर्व स्तरातील लोकांना आर्थिक व्यवहाराचे,सेवांचे,विम्याचे,निवृत्ती वेतनाची माहिती व्हावी,समाजातील दुर्लक्षित घटकांना आर्थिक साक्षर होण्यासाठी निर्माण केलेली महत्वपूर्ण योजना आहे.या योजनेच्या माध्यमातून सरकारकडून आर्थिक ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विशेष व्यवस्था केली जाते. ज्यामुळे आर्थिक समावेशान निर्माण केला जातो.जो आर्थिक निरक्षरता कमी करण्यास मदत होते.

5. लाडकी बहीण योजना

महाराष्ट्र राज्य सरकार कडून ही योजना २०२४ मध्ये सुरु करण्यात आली.राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शिंदे सरकारकडून ही योजना सुरु करण्यात आली.या योजनेंतर्गत राज्यातील वय वर्ष २१ ते ६० दरम्यान असणाऱ्या प्रत्येक महिलेला प्रत्येक महिन्याला १५०० रु.त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाणार आहे.

6. मुलींसाठी मोफत उच्च शिक्षण योजना

मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थिनीना १०० टक्के शुल्काची प्रतिपूर्ती केली जाणार आहे.त्यासाठी वर्षाला २००० कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे.यामध्ये पारंपारिक पदवी अभ्यासक्रम ते वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अशा जवळपास ५०० अभ्यासक्रमांचा समावेश आहे.या योजनेची घोषणा २०२४ च्या अंदाजपत्रकात करण्यात आली.

7. लेक लाडकी योजना

पिवळ्या आणि केशरी कार्ड धारकासाठी ही योजना १ एप्रिल,२०२३ पासून सुरु केली असून या अंतर्गत मुलीच्या जन्मानंतर ५००० रुपये,सहा वर्षाची झाल्यानंतर ४००० रुपये,सहावीत गेल्यानंतर ६००० रुपये अकरावीत ८००० रुपये आणि १८ वर्षाची झाल्यानंतर ७५००० रुपये दिले जाणार आहेत.या योजनेची घोषणा २०२४ च्या अंदाजपत्रकात करण्यात आली.

महिलांच्या आर्थिक साक्षरतेचे काही उपाय पुढील प्रमाणे:

केंद्र आणि राज्य सरकार देशभरातील महिलांच्या आर्थिक साक्षरतेसाठी पुढाकार घेत असले तरी आजही अनेक प्रश्न भेडसावत आहेत.त्यामुळे त्यांना आर्थिक शिक्षण घेण्यात अडचणी येतात.महिला मध्ये आर्थिक साक्षरता पातळी वाढविण्यासाठी पुढील उपाय योजना करणे गरजेचे आहे.

१. स्वयं-शिक्षणासाठी पुढाकार

हा प्रवास स्वतःपासून सुरू होतो. महिला वेबिनारमध्ये सहभागी होऊन, ऑनलाइन अभ्यासक्रमांसाठी साइन अप करून, आर्थिक पुस्तके वाचून आणि काही विश्वासार्ह आर्थिक वेबसाइट्स फॉलो करून त्यांचे ज्ञान वाढवू शकतात. स्वयं-शिक्षणासाठी ऑनलाइन व्हिडिओआणि ट्युटोरियलसह अनेक संसाधने ऑनलाइन उपलब्ध आहेत.

२. आर्थिक सल्लागारांशी संवाद

महिला वैयक्तिक आर्थिक संभाषणासाठी आर्थिक सल्लागार देखील शोधू शकतात. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढू शकतो आणि त्यांच्या शंका लवकर दूर होऊ शकतात. तथापि, महिलांनी त्यांच्या सल्लागारांशी सहजतेने संवाद साधण्याची खात्री केली पाहिजे आणि गरज पडल्यास प्रश्न विचारू आपल्या शंकांचे निरसन करू शकतात.

३. आर्थिक जागरूकता व शिक्षण

महिलांना त्यांचे जीवन जगताना विविध कौशल्याची गरज असतेउदा.बचत,गुंतवणूक,बजेट,गुंतवणुकीचे विविध माध्यमे, कर्ज व त्याचे व्यवस्थापन इत्यादी बाबींची त्यांना माहिती होण्यासठी त्यांच्यामध्ये त्या कौशल्याची निर्मिती होणे आवश्यक आहे.त्यासाठी त्यांची आर्थिक बाबीच्या संदर्भात जागृती करणे आवश्यक आहे.आर्थिक जागृती निर्माण करण्यासाठी आर्थिक जागृतीचे उपक्रम राबविणे आवश्यक आहे त्याच बरोबर विविध कोर्सद्वारे आर्थिक बाबीची माहिती समजावून सांगण्याची गरज आहे.

४.आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

ICT हे महिला आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठी एक प्रभावी साधन आहे.मोबाईल तंत्रज्ञान आज सर्व स्तरातील लोकांसाठी उपलब्ध आहे.याद्वारे आर्थिक साक्षरतेची माहिती व प्रशिक्षणाचे कार्य महिलासाठी करता येते.तसेच टीव्ही,मासिके आणि इंटरनेट यासारख्या माध्यमांचा वापर देशातील महिला आर्थिक साक्षरतेच्या प्रशिक्षणात उपयोगी ठरू शकतात.

५. ई शिक्षण

ई शिक्षण हे देखील एक प्रभावी शैक्षणिक साधन ठरू शकते,या माध्यमातून महिलांनाआर्थिक साक्षरतेचे धडे देता येतील.या माध्यमातून माहितीचे आदान प्रदान करण्याचे कार्य करता येईल.त्यातून आर्थिक साक्षरतेचा प्रचार आणि प्रसार करता येईल.

६.सामाजिक बदल

भारतीय महिलांना भेडसावणारी सर्वात मोठी समस्या म्हणजे पुरुषप्रधान संस्कृती होय.मोठया प्रमाणात महिलांना स्वतःचे उत्पन्नाचे साधन नाही,उत्पनासाठी त्यांना त्यांच्या जोडीदारावर अवलंबून रहावे लागते.आजही महिला चूल आणि मूल या सामाजिक बंधनात अडकलेल्या आहेत.त्यामुळे त्यांना कुटुंबाच्या आर्थिक व्यवहारात सहभाग घेता येत नाही.समाजाचा स्त्रीया बाबतचा हा परंपरागत दृष्टीकोन बदलणार नाही तोपर्यंत महीला खऱ्या अर्थाने आर्थिक साक्षर होणार नाहीत.

**निष्कर्ष**:

महिलांना आर्थिक स्वातंत्र्य आणि स्थिरता मिळविण्यासाठी आर्थिक साक्षरता समजून घेणे आणि त्यावर प्रभुत्व मिळवणे महत्त्वाचे आहे. आर्थिक साक्षरता हे संधींचे दरवाजे उघडते आणि सुरक्षित आर्थिक भविष्य सुनिश्चित करते. आर्थिक शिक्षण वाढवून, महिला आत्मविश्वासाने त्यांच्या आर्थिक प्रवासात मार्गक्रमण करू शकतात आणि स्वतःच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या फायद्याचे माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकतात. आर्थिक साक्षरतेचा प्रवास सुरू करण्यासाठी आजही उशीर झालेला नाही. ऑनलाइन सहज उपलब्ध असलेल्याशैक्षणिक संसाधनांसह, डिजिटल सादनाद्वारे आर्थिक साक्षरतेकडे जाणारे प्रत्येक पाऊल अधिक सुरक्षित आणि सक्षम भविष्याकडे जाणारे असेल यात दुमत नाही.

**संदर्भ सूची:**

1. स्त्री विमर्श : भारतीय परिप्रेक्ष्य : डॉ.के.एम.मालती ,विना प्रकाशन,दिल्ली (२०१२)
2. महिला सशक्तीकरण : इंद्रराज सिंह, डायमंड प्रकाशन
3. स्त्री प्रश्नाची चर्चा : रानडे प्रतिभा पापुलर प्रकाशन,मुबई (१९९१)
4. महिला सशक्तीकरण का सच : मीनाक्षी निशांत सिंह, ओमेगा प्रकाशन,न्यू दिल्ली
5. महिला आर्थिक साक्षरता: काळाची गरज : डॉ.प्रशांत पिसोळकर International E Research Journal Nov.2019
6. स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन : डॉ.अथर्व प्रकाशन धुळे,२०१३
7. योजना (मासिक) सप्टेबर २०२०
8. लोकराज्य (मासिक) जानेवारी २०२३